# <u>प्रेस नोट</u>

## वनविभागातील सरळसेवा भरती प्रक्रिया २०१९ पुढे ढकलण्याबाबत

वन विभागातील वनरक्षक भरती प्रक्रिया २०१९ अंतर्गत, महा-परीक्षा मार्फत ऑनलाइन लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये पात्र उमेदवारासाठी पुढील टप्प्यात कागदपत्रे तपासणे, शारीरिक मोजमाप, धाव चाचणी व लेखी परीक्षेतील गुण व धाव चाचणीतील गुण मिळून निवड यादी व प्रतिक्षा यादी जाहीर करणे तसेच २५/१६ कि.मी. (पुरुष/महिला) चालण्याची शारीरिक क्षमता चाचणी घेणे व नियुक्ती आदेश निर्गमित करणे हे टप्पे वनवृत्त स्तरावरील प्रादेशिक निवड समिती मार्फत आयोजित करण्यात आलेले असून उमेदवारांना याबाबत वेगवेगळ्या माध्यमातून कळविण्यात आलेले आहे. तथापी राज्यातील पुर परिस्थिती आणि दळणवळनाची असुविधा लक्षात घेता वनरक्षक भरती प्रक्रियातील पुढील टप्पे सद्यास्थितीत सुकर रीतीने पार पाडणे शक्य नसल्याने सदर प्रक्रिया पुढे ढकलण्यात येत असून निवड प्रक्रियेच्या सुधारित तारखा प्रादेशिक निवड समिती मार्फत वेगळ्याने कळविण्यात येईल तसेच याबाबत <u>www.mahaforest.gov.in</u> या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. वनरक्षक भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षेत पात्र सर्व उमेदवाराने याबाबतची नोंद घ्यावी असे श्री. विकास गुप्ता, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी कळविले आहे.